**ठळक बातम्या**

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देशभरात विशेष पदयात्रांचं आयोजन
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या हरियाणाच्या दौऱ्यावर / विविध पायाभूत सेवा विकास प्रकल्पांचं करणार उद्घाटन आणि भूमीपूजन
- जालियनवाला बाग हत्याकांडाला आज १०६ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त देशाची आदरांजली
- देशाच्या परकीय चलन साठ्यात गेल्या आठवड्यात दहा अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त वाढ

**आणि**

- वैशाखी सह सुगीच्या सणांचा देशभरात उत्साह

**<><><><><>**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीच्या एक दिवस आधी देशभरात विविध ठिकाणी पदयात्रा काढली जात आहे.

विकसित भारताच्या उभारणीसाठी बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, न्याय आणि बंधुत्वाच्या दृष्टिकोनातून प्रेरणा घेण्याचं आवाहन केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी आज युवकांना केलं आहे. बिहारमध्ये पटना इथं गांधी मैदानापासून सुरु होणाऱ्या पदयात्रेला त्यांनी हिरवा झेंडा दाखवला. यावेळी आंबेडकर जयंतीनिमित्त दिल्ली सरकारनं आज दिल्लीत वॉकेथॉनचं आयोजन केलं आहे. दिल्लीच्या

मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी या वॉकेथॉनला हिरवा झेंडा दाखवला या पदयात्रेत हजारो मुलांनी सहभाग घेतला.

आंबेडकर जयंतीनिमित्त युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे आज मुंबईत भीम पदयात्रेत सहभागी झाल्या. त्यांनी सांगितलं.....

**होल्ड - बाईट- रक्षा खडसे...**

नरिमन पॉइंट पासून मंत्रालयात आंबेडकर पुतळ्यापर्यंत ही पदयात्रा काढण्यात आली. यावेळी पदयात्रेत हजारो संख्येनं तरुण सहभागी झाले.

छत्तीसगढ मध्ये रायपूर इथं आज जय भीम पदयात्रेचे आयोजन इथं करण्यात आलं. यावेळी छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई उपस्थित होते.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त राज्यात आज सकाळी जिल्हा प्रशासनाच्यावतीनं जय भीम पदयात्रा काढण्यात आली. पथनाट्य आणि परिसंवादासह शाळेत राज्यघटनेची उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं तसंच नांदेड आणि बीड इथंही आज जिल्हा प्रशासन, जिल्हा युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्राच्या समन्वयानं जय भीम पदयात्रा काढण्यात आली.

आंबेडकर जयंतीनिमित्त राज्य शासनाच्या पर्यटन विभागाच्या पर्यटन संचालनालयानं येत्या १४ आणि १५ एप्रिलला मुंबई, नाशिक आणि नागपूर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्कीट सहलीचं आयोजन केलं आहे. या टूर सर्कीटमध्ये दादरमधील चैत्यभूमी, राजगृह, प्रिटींग प्रेस, परळ मधील बि.आय.टी चाळ, वडाळा इथलं डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, फोर्ट मधील सिद्धार्थ महाविद्यालय या स्थळांचा समावेश आहे.

आंबेडकर जयंती निमित्त उद्या नवी दिल्लीत संसद भवनात केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने आंबेडकर जयंतीचा उत्सव आयोजित केला आहे.  राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, आणि इतर मान्यवरांच्या हस्ते सकाळी बाबासाहेब आंबेडकरांना पुष्पहार अर्पण करून उत्सवाची सुरुवात होईल. हा कार्यक्रम दुपारी १२ नंतर सर्वांसाठी खुला असेल.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या हरियाणाला भेट देणार आहेत. सर्वप्रथम ते हिसार ते अयोध्या या नव्यानं सुरू होणाऱ्या विमान उड्डाण सेवेला हिरवा झेंडा दाखवतील आणि हिसार विमानतळाच्या नवीन टर्मिनल इमारतीची पायाभरणी करतील. हिसार इथं ते एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत. त्यानंतर, यमुनानगर इथं दीनबंधू छोटूराम औष्णिक वीज केंद्राच्या 800 मेगावॅट आधुनिक औष्णिक वीज प्रकल्पाची ते पायाभरणी करतील. या प्रकल्पामुळे हरियाणात गावोगावी अखंडित वीजपुरवठा करण्याच्या कामाला चालना मिळणार आहे.  भारतमाला परियोजनेअंतर्गत सुमारे 170 कोटी रुपये किमतीच्या सुमारे साडे चौदा किलोमीटर रेवाडी बाह्य वळणमार्गाचं उद्घाटनही मोदी करतील. यामुळे दिल्ली ते नारनौल प्रवासाचा वेळ सुमारे एक तासाने कमी होईल.

<><><><><>

जालियनवाला बाग हत्याकांडाला आज १०६ वर्षं पूर्ण होत आहेत. या हत्याकांडात बळी पडलेल्या हुतात्म्यांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी समाजमाध्यमावर आदरांजली वाहिली आहे. जालियानवाला बाग मैदानावर

भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी शहीद झालेल्यांना आपण आदरांजली अर्पण करत असून भारताची जनता सदैव त्यांची ऋणी राहील. त्यांच्या प्रेरणेने भारताचा प्रत्येक नागरिक देशाच्या प्रगतीसाठी आपलं योगदान देत राहील, असं मुर्मू आपल्या संदेशात म्हणाल्या आहेत.

देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात या शूरांचं अतुलनीय बलिदान कोरलं गेलं असून देश त्यांचा सदैव ऋणी राहील, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी जालियनवाला बाग हत्याकांडातल्या शहिदांना आदरांजली वाहताना म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही जालियनवाला बाग हत्याकांडातल्या शहीदांना आदरांजली वाहिली आहे. जालियनवाला बाग हत्याकांड हा देशाच्या इतिहासातला एक काळा अध्याय होता पण या हत्याकांडात शहीद झालेल्यांचं बलिदान स्वातंत्र्य लढ्यातला एक महत्त्वाचा टप्पा ठरला. त्यामुळे येणाऱ्या पिढ्यांना हे बलिदान सदैव प्रेरणादायी राहील, असं प्रधानमंत्री आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

१३ एप्रिल १९१९ हा दिवस देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील सर्वांत काळा दिवस असून ही घटना देशाच्या इतिहासातून कधीच पुसली जाऊ शकत नाही. या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या तमाम देशभक्त वीर हुतात्म्यांना आदरांजली, अशा शब्दांत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

भारताच्या परकीय चलन साठ्यात गेल्या आठवड्यात दहा अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त वाढ झाली आहे. यामुळे भारताचा परकीय चलन साठा ६७६ अब्ज

डॉलर्सच्या स्तरावर पोहचला आहे. दरम्यान देशाच्या सोन्याच्या साठ्यातही दीड अब्जाहून जास्त वाढ झाली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमध्ये रिझर्व्ह बँकेचे स्थान ४ कोटी डॉलर्सने वाढून ४ अब्ज ४६ कोटी डॉलर्स झालं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेने नव्याने जाहीर केलेल्या करांमधून स्मार्टफोन आणि संगणक यांनासवलत देण्याची घोषणा केली आहे. अमेरिकेच्या जकात आणि सीमा सुरक्षाविभागाने दिलेल्या सुचनांनुसार, अमेरिकेत आयात होणाऱ्या या दोन्ही वस्तूंसाठी बहुतेक देशांसह चीनला देखील अतिरिक्त करातून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याचा फायदा सेमीकंडक्टर, सोलर सेल आणि मेमरी कार्डसह इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि घटक यामध्ये होणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या पाच कंपन्यांना पश्चिम बंगालच्या हिंसाचारग्रस्त मुर्शिदाबादमध्ये जाण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रांची, जमशेदपूर आणि राजारहाट इथून या कंपन्या मुर्शिदाबादला जातील. वक्फ सुधारणा कायद्याच्या विरोधात इथं सुरू असलेल्या निदर्शनादरम्यान झालेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर तातडीनं केंद्रीय सशस्त्र दलांना पाचारण करायचे आदेश कोलकाता उच्च न्यायालयानं काल दिले होते. सीमा सुरक्षा दलाचे दक्षिण बंगाल विभागाचे पोलीस महानिरीक्षक करणी सिंह शेखाबत यांनी राज्याचे पोलीस महासंचालक, अतिरिक्त पोलीस महासंचालक आणि इतर पोलीस अधिकाऱ्यांसोबत या संदर्भात बैठक घेतली.

**<><><><><>**

देशाच्या विविध भागात आज सुगीच्या सणांचा उत्साह दिसत आहे. पंजाबमधे वैशाखी, केरळात विशु, पश्चिम बंगालमधे पोईला बोईशाख आसामात बोहाग बिहू तर तमिळनाडूत पुथंडूच्या रुपाने हे सण साजरे केले जातात. देशाच्या उत्तर भागात वैशाखी उत्साहाने साजरी होत आहे. विशू आणि पुथंडू उद्या साजरे होणार आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. या उत्सवामधून देशाच्या विकासाकरता समर्पणाचा संदेश मिळतो असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. या विविधरंगी उत्सवांमधून भारताची समृद्ध आणि विविधतेने नटलेली कृषीवल संस्कृती दृग्गोचर होते असं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. हे उत्सव नवी आशा, आनंद आणि भरभराट आणतात अशा शब्दात प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्सचा सामना रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू बरोबर जयपूर इथं होणार आहे. दुपारी साडेतीन वाजता खेळ सुरु होईल. आजचा दुसरा सामना दिल्लीत दिल्ली कॅपिटल्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता होईल.

काल लखनऊ सुपर जायंटस् आणि गुजरात टायटन्स यांच्यात लखनऊ इथं झालेला सामना लखनौ सुपर जायंटस् संघानं सहा गडी राखून जिंकला.

**//<><><><><>//**